महाराष्ट्र जिओस्पेशिअल टेक्नॉलॉजी ॲप्लिकेशन सेंटर (महाजिओटेक)
मंत्रालय विस्तार इमारत, भाईशंकर याज्ञिक मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
ईमेल: mahageotech@outlook.com

जाहिरात क्र. महाजिओटेक/प्र.क्र.५/भरती/०१/२०२६

सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्यांची कंत्राटी / सेवा करार पद्धतीने नियुक्तीबाबत जाहिरात

महाराष्ट्र जिओस्पेशिअल टेक्नॉलॉजी ॲप्लिकेशन सेंटर (महाजिओटेक) या महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाच्या अखत्यारीतील कंपनी अधिनियम कलम ८ अंतर्गत नोंदणीकृत कंपनीमध्ये प्रशासकीय व वित्तीय कामकाजासाठी खालील नमूद पदांवर सेवा करार पद्धतीने कामकाज करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या पात्र अधिकाऱ्यांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत:

अ.क्र.	पदाचे नाव	पदसंख्या	आवश्यक अर्हता व अनुभव	कमाल वयोमर्यादा
१.	आस्थापना अधिकारी	०१	मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील सेवानिवृत्त उपसचिव / अवर सचिव संवर्गातील अधिकारी; आस्थापना व प्रशासकीय कामकाजाचा किमान ३ वर्षांचा अनुभव.	६० वर्षे
२.	लेखा अधिकारी	०१	महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-अ (सहायक संचालक / लेखा अधिकारी) संवर्गातून सेवानिवृत्त अधिकारी; शासकीय लेखा व वित्त नियमांचा किमान ३ वर्षांचा अनुभव.	६० वर्षे
३.	सहायक कक्ष अधिकारी	०१	मंत्रालयीन संवर्गातून सेवानिवृत्त सहायक कक्ष अधिकारी; टिपणी, मसुदा लेखन व नस्ती हाताळणीचा किमान ३ वर्षांचा अनुभव.	६०वर्षे

Scanned with OKEN Scanner

➢ **मानधन व भत्ते :**

१. मासिक पारिश्रमिक = सेवानिवृत्तीवेळचे अंतिम मूळ वेतन वजा मूळ निवृत्तीवेतन (Last Basic Pay minus Basic Pension).

२. प्रवास भत्ता व दूरध्वनी खर्चापोटी अनुज्ञेय एकत्रित ठोक भत्ता (कमाल २५% च्या मर्यादेत) देय राहील.

➢ **महत्त्वाच्या अटी व शर्ती :**

१. कालावधी: सदर नियुक्ती पूर्णतः तात्पुरत्या स्वरूपात सुरुवातीस ११ महिने कालावधीसाठी राहील. आवश्यकतेनुसार व समाधानकारक कामगिरीनुसार कालावधी दरवर्षी नूतनीकरण करून कमाल ३ वर्षांपर्यंत किंवा वयाची ६५ वर्षे पूर्ण होईपर्यंत वाढविता येईल.

२. चारित्र्य व चौकशी: सेवानिवृत्तीच्या वेळी तसेच सद्यस्थितीत संबंधितांविरुद्ध कोणतीही विभागीय चौकशी, फौजदारी अथवा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची चौकशी प्रलंबित अथवा प्रस्तावित नसावी.

३. आरोग्य: अर्जदार शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम असणे आवश्यक असून, नियुक्तीपूर्वी सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्याचे आरोग्य प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

४. हक्क व अधिकार: ही नियुक्ती निव्वळ सेवा करार पद्धतीने होत असल्याने संबंधित उमेदवारास नियमित सेवेचे कोणतेही हक्क किंवा संरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. निवड झालेल्या अधिकाऱ्यास गोपनीयतेचे हमीपत्र व हितसंबंध गुंतलेले नसल्याचे प्रमाणपत्र लिहून द्यावे लागेल.

५. करार समाप्ती: असमाधानकारक कामकाज आढळल्यास अथवा प्रशासकीय गरजेअभावी एका महिन्याची पूर्वसूचना देऊन करार समाप्त करण्याचे अधिकार कंपनी व्यवस्थापनाकडे राहतील.

➢ **अर्ज सादर करण्याची पद्धत व मुदत :**

- इच्छुकांनी आपला परिपूर्ण अर्ज खालील विहित नमुन्यात, आवश्यक कागदपत्रांच्या (उदा. सेवानिवृत्ती आदेश, पीपीओ प्रत, अंतिम वेतनाचे प्रमाणपत्र) साक्षांकित प्रतींसह mahageotech@outlook.com या ईमेलवर अथवा खालील पत्त्यावर बंद लिफाफ्यात पाठवावा.
  पत्ता- कक्ष अधिकारी,१४१८,नियोजन विभाग, दालन क्र.६४१,मंत्रालय विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
- अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक: ११ /११ /२०२६ सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत.
- केवळ पात्र व छाननीअंती निवडलेल्या उमेदवारांनाच मुलाखतीकरिता पाचारण करण्यात येईल.
- सदर भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचा अधिकार व्यवस्थापकीय संचालक, महाजिओटेक यांनी राखून ठेवला आहे.

व्यवस्थापकीय संचालक

महाजिओटेक, मुंबई

Scanned with OKEN Scanner

अर्जाचा विहित नमुना

महाराष्ट्र जिओस्पेशिअल टेक्नॉलॉजी ॲप्लिकेशन सेंटर (महाजिओटेक)

सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्यांसाठी सेवा करार पद्धतीने नियुक्तीचा अर्ज

येथे स्वतःचा अलिकडील पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवावा

प्रति,
व्यवस्थापकीय संचालक,
महाजिओटेक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

विषय : सेवा करार पद्धतीने ..... या पदासाठी अर्ज.

१.	उमेदवाराचे संपूर्ण नाव (मराठीत व इंग्रजीत)	
२.	कायमचा व पत्रव्यव्हाराचा पत्ता	
३.	मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी	
४.	जन्मतारीख व सेवानिवृत्तीवेळचे वय	
५.	शासकीय सेवेतून सेवानिवृत्तीचा दिनांक	
६.	सेवानिवृत्तीवेळचे पद, संवर्ग व विभाग/कार्यालय	
७.	सेवानिवृत्तीवेळची वेतनश्रेणी / वेतनस्तर (Pay Matrix)	
८.	निवृत्तीवेळचे अंतिम मूळ वेतन (Last Basic Pay)	रु.
९.	मंजूर मूळ निवृत्तीवेतन रक्कम (Basic Pension)	रु.
१०.	पी.पी.ओ. (PPO) क्रमांक	
११.	प्रशासकीय/आस्थापना/लेखा कामकाजाचा अनुभव (थोडक्यात तपशील)	
१२.	विभागीय चौकशी / फौजदारी प्रकरण प्रलंबित किंवा प्रस्तावित आहे काय?	होय / नाही

Scanned with OKEN Scanner

हमीपत्र (Undertaking):

मी याद्वारे प्रमाणित करतो/करते की, वरील अर्जात दिलेली सर्व माहिती माझ्या व्यक्तिगत ज्ञानानुसार व समजुतीनुसार पूर्णपणे सत्य व बिनचूक आहे. माझ्याविरुद्ध कोणतीही न्यायालयीन, फौजदारी अथवा विभागीय चौकशी प्रलंबित किंवा प्रस्तावित नाही. माझी निवड झाल्यास महाजिओटेक कंपनीने विहित केलेले सर्व नियम, अटी-शर्ती व गोपनीयतेचे निकष पाळण्यास मी पूर्णपणे कटिबद्ध राहीन.

ठिकाण : .....

दिनांक : .....

(उमेदवाराची स्वाक्षरी व नाव)

Scanned with OKEN Scanner